# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## कुलसचिव यांचे कार्यालय

एम.आय.डि.सी. रोडकॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५


---

जावक क्रमांक/गो.वि./सांख्यिकी विभाग/शिष्यवृत्ती/०२/२०२०    दिनांक २२/१०/२०२०

# परीपत्रक

**विषय – अनुसूचीत जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शिष्यवृत्तीच्या सबबीखाली रद्द न करण्याबाबत.**

संदर्भ – 1. मा.समाज कल्याण आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/का-4ब/नस्ती क्र. 804/20-21/15412 दि.14.10.2020

2. मा.सहाय्यक आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. सआसक/गड/भासशि/अनु.जाती विद्यार्थी/प्रवेश रद्द न करण्याबाबत/2020-21/855 दिनांक.16.10.2020

सादर,

उपरोक्त अ.क्र.1 व 2 कार्यालयाचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने विषयांकीत प्रकरणी कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचीत जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन 2019-20 या शैक्षणिक वर्षातील देय शिष्यवृत्ती शासनाकडून मिळाली नाही, त्यामुळे शिष्यवृत्तीच्या सबबीखाली विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करू नये तसेच मा. आयुक्त कार्यालय, पुणे यांचे संदर्भीय पत्राचे अवलोकन करून योग्य ती कार्यवाही घेण्यात यावी.

कळावे,

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत – संदर्भीय पत्र

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 418 दि. 19/10/2020
जावक क्र. 342 दि. 19/10/20

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

# कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गडचिरोली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, एल.आय.सी.ऑफिस रोड, गडचिरोली. ता.जि.गडचिरोली-४४२६०५
E-mail :- sdswog@gmail.com / New email Id- acswogadchiroli@gmail.com ☎ No. ०७१३२-२२२१९२

क्र.सआसक/गड/भासशि/अनु.जाती विद्यार्थी/प्रवेश रदद न करण्याबाबत/२०२०-२१/ 855 दि.- 16/10/2020

**महत्वाचे**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 3553 दि. 16/10/20
जावक 3553 दि. 16/10/20

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 6594 दि. 16/10/2020
जावक क्र. 10408 दि. 17/10/2020

प्रति,

१. मा. कुलसचिव,
गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली.

२. संस्था अध्यक्ष / प्राचार्य,
सर्व महाविद्यालय, (गडचिरोली जिल्हा)
जि. गडचिरोली.

**विषय :- अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शिष्यवृत्तीच्या सबबीखाली रदद न करण्याबाबत.**

संदर्भ :- १) मा. आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.१५४१२, दिनांक - १४.१०.२०२०.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.६२५, दिनांक - २५.०८.२०२०.
३) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपुर यांचे पत्र क्र.३९२०, दि.०८.०९.२०२०

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्र क्र.१ चे अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालयात प्रवेशीत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील देय शिष्यवृत्ती शासनाकडुन मिळाली नाही, त्यामुळे शिष्यवृत्तीच्या सबबीखाली विद्यार्थ्यांचे प्रवेश रदद करु नये व तसे आदेश जिल्हयातील विद्यापीठ, शैक्षणिक संस्था, वा महाविद्यालयांना देणेबाबत कळविलेले आहे. तसेच अनु.जातीच्या कोणत्याही विद्यार्थ्यांकडुन महाविद्यालयांनी शुल्काची मागणी करण्यात येवू नये अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट नमूद केलेले आहे. त्यानुसार आयुक्तालयाचे पत्रातील निर्देशानुसार, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे निकालपत्र अथवा इतर कागदपत्रांची, शिष्यवृत्ती / फ्रिशिप च्या अदायगी अभावी अडवणूक महाविद्यालयांनी करु नये अन्यथा सदर योजनेच्या प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधीत महाविद्यालयांवर कार्यवाही करण्यात येईल, याची महाविद्यालयांनी नोंद घेण्याबाबत यापुर्वीच कळविण्यात आलेले आहे.

तथापी याव्दारे आपणास कळविण्यात येते कि, जिल्हयातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची मागील वर्षातील शिष्यवृत्ती/ शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती मंजूर झालेली नाही, या कारणास्तव विद्यापिठ, शैक्षणिक संस्था व महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणापासून वंचित ठेवू नये. अन्यथा सदर योजनेच्या प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधीत महाविद्यालयांवर कार्यवाही करण्यात येईल, याची जिल्हयातील महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण गडचिरोली

**प्रतिलीपी - माहितीस्तव सविनय सादर,**

१. मा. आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपुर.

सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण गडचिरोली

डॉ. कुंभारे
नोंद
महाविद्यालये व पदव्युत्तर विभागांना परिपत्रक द्यावे
17/10/2020
त्वरित कार्यवाही करा
अ. स. (नामा.)
17/10

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय,३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

दूरध्वनी क्र.२०-२६१३७१८६ फॅक्स क्र.०२०-२६१२६६१८ ईमेल directorsocialwelfare@yahoo.co.in

क्र.सकआ/शिक्षण/भासशि/का-४ब/ नस्ती क्र.८०४/२०२०-२१/१५४१२ दिनांक :- /०९/२०२० २४/१०/२०२०

प्रति,

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शिष्यवृत्तीच्या सबबीखाली रद्द न करण्याबाबत राज्यातील विद्यापीठे व शैक्षणिक संस्था/महाविद्यालयांना आदेश देणेबाबत...

संदर्भ:
१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक ८ डिसेंबर, २०१७
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/ प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दिनांक ८ जानेवारी, २०१९
३) आयुक्तालयाचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/महाडीबीटी पोर्टल २०१९-२०/ शिष्यवृत्ती/ २०२१/८६५, दि. २०/०८/२०२०
४) शासन पत्र क्रमांक अजाशि-२०२०/प्र.क्र.११३/शिक्षण-१, दिनांक १५ सप्टेंबर, २०२०
५) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नाशिक यांचे पत्र क्र. १७२१, दि. ०२/०९/२०२०
६) महाआयटी कॉर्पोरेशन, यांना आयुक्तालयाचे इमेलव्दारे दि. २ सप्टेंबर, २०२० चे आदेश.

वरील संदर्भ क्र. ४ चे शासन पत्रासोबत विशेष कार्यकारी अधिकारी, मा. मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ३० जुलै, २०२० च्या पत्राची प्रत व श्री. राहूलदेव मनवर यांच्या दिनांक २२ जुलै, २०२० च्या निवेदनाची प्रत आयुक्तालयास प्राप्त झालेली आहे.

सदर निवेदनामध्ये व उपरोक्त संदर्भीय क्र. ५ च्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नाशिक यांनी केलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाकरीता महाडीबीटी प्रणाली मार्फत राबविण्यात येणारी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक येथील दुरस्थ / बहिस्थ अभ्यासक्रमास प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदायगीबाबत अडचणी येत असल्याचे कळविले आहे. याबाबत सद्यस्थितीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठामधील दुरस्थ अभ्यासक्रम घेत असलेले शिष्यवृत्ती धारक अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याचा लाभ देय असल्याचे प्रणालीमध्ये निदर्शनास येत आहे. वास्तविक भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या दिनांक १/०४/२००३ व दिनांक ३१ डिसेंबर, २०१० च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना मध्ये उल्लेख असल्याप्रमाणे दुरस्थ अभ्यासक्रमांना केवळ बुक ग्रॅन्ट या करीता वार्षिक रु.१२००/- प्रमाणे लाभ देय आहे. मात्र सद्यपरिस्थितीत इतर पूर्णवेळ अभ्यासक्रमांप्रमाणेच या विद्यार्थ्यांना देखील निर्वाह भत्ता लागू असल्याचे प्रणालीमध्ये निदर्शनास येत आहे. त्यामुळे सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन्ही शैक्षणिक वर्षांमधील ऑनलाईन अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नाशिक या कार्यालयाकडून तपासणी करुन संबंधीत विद्यापीठाच्या आयडीवर पुनश्चः पाठविण्यांत (Revert back) करण्यात आलेले आहेत.

Scanned with CamScanner

सदर बाब आयुक्तालयाच्या निदर्शनास येताच संदर्भीय क्रमांक ६ अन्वये आयुक्तालयाने प्रणालीमध्ये योग्य त्या सुधारणा तात्काळ करण्याचे व अशा अर्जांनवर प्रक्रिया करण्याकरीता विशेष कालावधी देण्याबाबतच्या सूचना महाआयटी कार्पोरेशनच्या तांत्रिक विभागास इमेलव्दारे कळविले आहे. सबब याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन यांचेशी देखील दि. ०२/०९/२०२० रोजी कॉन्फरन्स कॉल व्दारे चर्चा झाली असून याबाबत डीबीटी प्रणालीमध्ये लवकरच सुधारणा करुन याकरीता विशेष कालावधी देण्याचे महाआयटीचे प्रकल्प अधिकारी यांनी आश्वासित केले आहे.

त्याप्रमाणे सदर निवेदनान्वये अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील देय शिष्यवृत्ती शासनाकडुन मिळाली नाही, त्यामुळे शिष्यवृत्तीच्या सबबीखाली विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करु नये व तसे आदेश राज्यातील विद्यापिठ, शैक्षणिक संस्था वा महाविद्यालयांना देणेबाबत कळविलेले आहे.

तरी उपरोक्त सुधारणा प्रणालीमध्ये कार्यरत होण्यापर्यंत संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयामध्ये अनु.क्र. ६ वर "अनुसूचित जातीच्या कोणत्याही विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांनी शुल्काची मागणी करण्यात येवू नये अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल." असे स्पष्ट नमूद केलेले आहे. त्यानुसार आयुक्तालयाचे संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे निकालपत्र अथवा इतर कागदपत्रांची, शिष्यवृत्ती / फ्रीशिप च्या अदायगी अभावी अडवणूक महाविद्यालयांनी करु नये अन्यथा संदर्भीय क्र. १ च्या सदर योजनेच्या प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधीत महाविद्यालयांवर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्याबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग व सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे स्तरावरुन जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना योग्य त्या स्पष्ट लेखी सूचना निर्गमित करणेबाबत अलाहिदा कळविण्यात आलेले आहे.

तथापि, संदर्भ क्र. ४ च्या शासन पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची मागील वर्षातील शिष्यवृत्ती/ शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती मंजूर झालेली नाही, या कारणास्तव विद्यापीठ, शैक्षणीक संस्था वा महाविद्यालयाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणापासून वंचित ठेवू नये. अन्यथा सदर योजनेच्या प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधीत महाविद्यालयांवर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यांबाबत आपल्या जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना आपल्यास्तरावरुन योग्य त्या स्पष्ट लिखित सुचना निर्गमित कराव्यात.

(डॉ. प्रशांत नारनवरे)
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
२) मा. सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२
३) विशेष कार्यकारी अधिकारी, मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
४) श्री. राहुलदेव वि. मनवर email- rahuldeomanwar@gmail.com

Scanned with CamScanner